नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 30/12/2020 (बुधवार)
(सकाळ)

---

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 01 कि. मी अंतरावर चिचोली वार्ड क्र. 1, गजानन मंदीर जवळ आबादी 01 येथे दिनांक 28/12/2020 चे 19.45 वा. दरम्यान आरोपी नामे– 1) राजेंद्र उर्फ सोनु दिलीप वगारे, वय 24 वर्ष व 2) देवेंद्र दिलीप वगारे, वय 19 वर्ष, रा. चिचोली यांनी संगणमत करून फिर्यादी नामे– सचिन भुषनलाल घोडेस्वार, वय 39 वर्ष, रा. वार्ड क 1 चिचोली खापरखेडा व त्यांचे घरचे लोकांना, 'रोडवर पत्ते खेळण्यापासुन का मनाई करता' या कारणावरून झगडाभांडण करून लाकडी दांड्याने व कोयत्या सारख्या धारदार शस्त्राने डोक्यावर, मानेवर व हातावर मारून जिवघेण्याचे उद्देशाने जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 307, 324, 323, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. अंधारे 9823150134 हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 10 कि.मी अंतरावर न्यु गुजरखेडी येथे दिनांक 28/12/2020 चे 13.00 वा. ते दिनांक 29/12/2020 चे रात्री दरम्यान फिर्यादी नामे– राहुल जगदिश नायक, वय 27 वर्षे, रा. वार्ड नं.03, सावनेर हे परिवारासह डोंगरगड येथे दर्शनाकरिता गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे दाराचे कडीकोंडा व कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादीच्या घरातील सोन्या–चांदीचे दागिने 1,82,500/–रू. व नगदी 60,000/–रु. असा एकुण कि. 2,42,500/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री पाटील 8805253982 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर